पुढारी

# अभियांत्रिकी विद्यालयात सायबर सुरक्षा करार

कराड : पुढारी वृत्तसेवा

शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, कराड आणि क्विक हील फाऊंडेशन यांच्यात सायबर सुरक्षेसाठी सामंजस्य करार करण्यात आला.

'सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा' या उपक्रमाची प्रभावी सुरुवात करण्यात आली. विद्यार्थ्यांमध्ये सायबर सुरक्षेबाबत जागरूकता निर्माण करणे तसेच समाजामध्ये जनजागृती घडवणे, हा या उपक्रमाचा प्रमुख उद्देश आहे. उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांना विविध शाळा, महाविद्यालये आणि सार्वजनिक ठिकाणी सायबर सुरक्षेवरील सादरीकरणे करण्याची संधी दिली जाणार आहे. विशेष म्हणजे, या उपक्रमाचा समावेश 'कमवा आणि शिका' योजनेत करण्यात आला आहे, त्यामुळे विद्यार्थ्यांना आर्थिक लाभाबरोबरच अनुभव व आत्मविश्वास प्राप्त होणार आहे. क्विक हील फाऊंडेशनच्या मार्गदर्शनाखाली उपक्रमाची अंमलबजावणी केली जात असून पुण्यातील क्विक हील फाऊंडेशनच्या मुख्य कार्यालयात प्रशिक्षण कार्यशाळा पार पडली.

कार्यशाळेत संस्थेच्या अध्यक्षा अनुपमा काटकर, तसेच सहकारी अजय शिर्के, गायत्री केसकर, साक्षी लवंगरे आणि दीपू सिंह यांनी सायबर गुन्हेगारी, तिचे परिणाम व प्रतिबंधक उपाय याविषयी सखोल मार्गदर्शन केले. क्लबमध्ये प्रतीक गुंजाळकर, अनुराग वाझरकर, प्राजक्ता पवार, वैष्णवी निकम हे विद्यार्थी सदस्यअसून, प्रशिक्षणात या सर्व विद्यार्थ्यांनी तसेच मार्गदर्शक प्राध्यापिका डॉ. प्रियांका शिंदे यांनी सहभाग नोंदवला. विद्यार्थ्यांनी उपक्रमास उत्स्फूर्त प्रतिसाद



कराड : करार करताना अनुपमा काटकर, अजय शिर्के, गायत्री केसकर, साक्षी लवंगरे आदी.